REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 2 | NOVEMBER - 2018

# आदिवासी स्त्री विकास व राजकीय सामाजिकरण चळवळीत कार्य करणाऱ्या निवडक महिलांचा परिचयात्मक अभ्यास (विशेष संदर्भ: धुळे जिल्हा)



प्रा.डॉ.सुरेंद्र अंबर मोरे[१] , प्रा.विरेंद्र मुरलीधर घरडे[२]
[१]राज्यशास्त्र विभाग, जयहिंद एज्युकेशन ट्रस्टचे झुलाल भिलाजीराव पाटील कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय, धुळे ता.जि.धुळे)
[२]राज्यशास्त्र विभाग, गंगामाई एज्यु.ट्रस्टचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नगाव ता.जि.धुळे


- **सारांश -**

सध्याच्या युगात आदिवासी महिला चळवळ व त्यांचे राजकीय सामाजिकरण याला महत्त्वाचे स्थान प्राप्त होत आहे. विशेष करून आदिवासी महिलांमध्ये राजकीय जागृती व विकास होणे या बाबत शासन अत्यंत कर्तव्य दक्ष आहे. त्यांच बरोबर आदिवासी महिलांशी संबंधीत कार्य करणाऱ्या महिला देखील आदिवासी महिलांचे सामाजिक व राजकीय प्रश्न शासन व समाजासमोर मांडण्यासाठी पुढे येत आहे. अशा निवडक महिलांच्या कार्याचा परीचय प्रस्तुत शोध निबंधात आहे.


- **प्रस्तावना -**

आदिवासी महिलांचे अनेक सामाजिक, आर्थिक, राजकीय सांस्कृतिक कौटूंबिक प्रश्न आहेत. विशेष करून आदिवासी महिला राजकीय सामाजिकरण होवून त्यांच्यात राजकीय जागृती होणे काळाची गरज आहे आणि हि जागृती करण्यात काही महिला अग्रेसर आहे ज्यांच्या कार्याची माहिती जनतेला होणे आवश्यक आहे. अशा या महिलांनी केलेल्या कार्याचा थोडक्यात परीचय प्रस्तुत शोध निबंधात आहे.

**उद्देश -**

१) आदिवासी स्त्री विकास व राजकीय सामाजिकण चळवळीत कार्य करणाऱ्या महिलांनी केलेल्या कार्याचा थोडक्यात आढावा समाज व शासनासमोर मांडणे.
२) आदिवासी महिलांच्या राजकीय सामाजिकरणाबाबत सरकारमध्ये जागृती आणणे

- **महत्त्व -**

आदिवासी महिलांच्या राजकीय निर्णय व कृतीचा परीणाम शासनाच्या निर्णय व निती प्रक्रियेवर होत असतो. प्रस्तुत शोधनिबंधातील महिलांनी केलेल्या कार्याची दखल शासनाने घ्यावी व आदिवासी महिलांचे राजकीय सामाजिकरण करून त्यांचे सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक प्रश्न सोडविण्याच्या दृष्टिकोणातून प्रस्तुत शोधन अभ्यासाला महत्त्व प्राप्त होते.

- **उद्देश -**

आदिवासी महिलांचे राजकीय सामाजिकरण घडवून आणने व त्यांच्या राजकीय जागृती निर्माण करण्यात महिलांची भुमिका काय होती हे सांगुन या महिलांचा कार्याचा आढावा समाजातील सर्व स्तरावर पोहचून त्यांनी केलेले कार्याचे महत्त्व समाजाला पटवून देणे हा शोध निबंधाचा उद्देश आहे.

LBP PUBLICATION

- **संशोधन पध्दती -**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी सामाजिकशास्त्रे संशोधनातील विश्लेषणात्मक पध्दतीचा अवलंब केला आहे. तसेच प्रस्तुत संशोधन निबंधासाठी ग्रंथ, पुस्तके सारख्या साधनांचा उपयोग करण्यात आला आहे.

- **गृहितके -**

१. आदिवासी महिलांच्या राजकीय सामाजिकरण व विकासात महिलांनी केलेले कार्य श्रेष्ठ दर्जाचे आहे.
२. महिलांच्या कार्यामुळे आदिवासी महिलांच्या सामाजिक व राजकीय सामाजिकरण व जागृतीला तसेच विकासाला चालना मिळणार आहे.

आधुनिक काळात "स्त्रीवादी इतिहास अभ्यासाला" महत्त्वाचे स्थान आहे. पुरुषांनी जसा इतिहास घडविला तसाच इतिहास स्त्रियांनी घडविल्यामुळे स्त्रियांच्या कृतीशील इतिहासाच्या अभ्यासाला महत्त्व प्राप्त होते. थोडक्यात स्त्रीवादी इतिहास म्हणजे इतिहासाच्या सर्व कालखंडात स्त्रियांची एकूण स्थिती, दर्जा, स्त्रियांचे प्रश व त्यांचे योगदान याचा अभ्यास करणे होय. म्हणून विशेषकरुन आदिवासी स्त्री विकास व चळवळ क्षेत्रात कार्य केलेल्या निवडक महिलांचा अभ्यास करणे प्रस्तुत संशोधनासाठी आवश्यक ठरते.

***१. सावित्रीबाई फुले***

सा १८३१ मध्ये सावित्रीबाईंचा जन्म झाला. त्यांचे मुळगाव खंडाळपेठ जिल्हा सातारा इ. स. १८४० मध्ये सावित्रीबाईंचे लग्न ज्योतिरावांबरोबर झाले व त्यांनी स्त्रीविकास कार्यक्षेत्रात कार्य करण्याची सुरुवात पुण्यातून केली. समाजातील अनिष्ठ रुढी, प्रथा, परंपरा दूर करणे व स्त्री विकासासाठी स्त्री शिक्षणाचा प्रसार करणे हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून त्यांनी पुण्यात १८४८ मध्ये पहिली मुलींची शाळा काढली.

सावित्रिबाईंनी ज्याप्रमाणे स्त्रीशिक्षणासाठी कार्य केले त्याचप्रमाणे अस्पृश्यता निवारण करणे, दलित आदिवासी समाजाला मानाचे स्थान मिळवून देणे इत्यादीमध्ये महत्वपूर्ण योगदान दिले. महार वस्तीत स्वतंत्र शाळा काढली, अस्पृश्यांना पाणी उपलब्ध व्हावे म्हणून आपल्या घरातील पाण्याचा हौद अस्पृश्यांसाठी खुला केला. त्याचबरोबर सावित्रीबाईंनी 'महिला सेवा मंडळ' ची स्थापना करुन स्त्रियांवर होणाऱ्या अयाय अत्याचार शोषण मुक्तीची मोठी चळवळ महाराष्ट्रात उभारली. त्याचबरोबर शिक्षणाची दारे स्त्रियांसाठी मोकळी करुन तिला अज्ञानाच्या गुलामगिरीतून मुक्त करणे हे त्यांच्या कार्याचे पहिले पाऊल होते.

***२. लिलाताई पराडकर***

मध्यप्रदेशातील आदिवासी महिलांच्या शिक्षणात योगदान दिले. सा १९९९ मध्ये राणी गाइडिल्यू स्त्री शक्ती पुरस्काराने समानित करण्यात आले.

***३. श्रीमती चित्रा पिल्ले***

तामिळनाडूतील मदुराई येथे बचत गटाच्या माध्यमातून आदिवासी महिलांच्या विकासात योगदान, त्याचबरोबर जमीनदार, सावकार, राजनितिज्ञ व अधिकारी यांच्याविरुद्ध लोक आंदोलनांमध्ये नेतृत्व केले.

***४. वैशाली पाटील***

आदिवासी दैवत म्हणून वैशाली पाटील यांची ओळख आहे. त्या मागील १८ वर्षापासून ठाणे जिल्ह्यात कार्यरत आहेत. विशेष म्हणजे आदिवासी महिलांच्या गर्भधारणा व प्रसुती समस्या क्षेत्रात त्या विशेषत्वाने कार्य करतात. आदिवासी भागात गरोदर महिलांची नॉर्मल प्रसुती करण्याच्या तंत्रामुळे त्या प्रसिद्ध आहेत. त्यांना आनंदीबाई जोशी पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

***५. मेधा पाटकर (नर्मदा बचाव आंदोलन)***

नर्मदा बचाव आंदोलाचे नेतृत्व करणारे आदिवासींच पुनर्वसा व गावपाडे यांच्या विकासासाठी सतत प्रयत करणारे नेतृत्व म्हणजे मेधा पाटकर. नर्मदा नदीवर बांधण्यात येणाऱ्या सरोवराच्या जलाशयामुळे महाराष्ट्र, मध्यप्रदेश, गुजरात मधील ओक आदिवासी शेतकरी कुटुंबे विस्थापित होणार आहेत. १७३०० हेक्टर जंगल धरणाखाली येणार असून जवळजवळ



LBP PUBLICATION

अडीच लाख लोक बेघर होणार असल्याने पर्यावरणात्मक व विस्थापितांचे प्रश्न निर्माण होऊन आदिवासी समाजाच्या अधिकार व हक्कांच्या संरक्षणार्थ ते मागील २५ वर्षापासून लढा देत आहेत. आदिवासींची पिळवणूक थांबविणे व त्यांना त्यांचे पुर्नअस्तित्व प्राप्त करून देणे हेच जीवनलक्ष असल्यामुळे त्यांनी स्वतःची एक नवीन जाणीव निर्माण केली आहे.

### ६. *हिमादेवी, गंगादेवी, गौरेदवी, मीरादेवी, बचनी देवी (चिपको आंदोलन)*

चिपको आंदोलनामध्ये या चारही महिलांचा सहभाग होता. निसर्गसंपदा व त्यावर आधारित आदिवासी मानवी जीवन सुरक्षित करण्यासाठी त्यांनी "आधी आम्हाला कापा नंतर वृक्ष कापा" असा नारा या महिलांनी दिला. सन १९७४ च्या चिपको आंदोलनामध्ये गौरीदेवी या महिलेच्या नेतृत्वाखाली जंगलाकडे जाणारा रस्ता रोखून दलाल व व्यापारी यांच्यावर नियंत्रण प्रस्थापित केले. त्यामुळे खाजगी कंपयांनी जंगलाच्या ऱ्हासाला केलेला विरोध निवळला.

यांच्या आंदोलनामुळे स्पष्ट होते की, पर्यावरण संरक्षणाबाबत स्त्रियांच्या जाणिवा विकसित
झाल्या आहेत. त्याचबरोबर त्यांना जंगल व पर्यावरणाचे महत्त्व पटले. त्यातूनच आदिवासी जीवन सुरक्षीततेचे महत्त्व त्यांना पटू लागले.

### ७. *मृणाल गोरे*

महाराष्ट्राच्या राजकारणात मृणाल गोरे यांचे नाव मानसन्मानाने घेतले जाते. विधानसभा सदस्य व विधानसभा विरोधीपक्ष नेत्या म्हणून त्या संपूर्ण भारताला प्रचलित आहेत. महत्त्वाचे म्हणजे विधानसभेत "गर्भजल परीक्षण विरोधी" विधेयक मांडून त्यांचे कायद्यात रुपांतर करुन घेण्याच्या कार्यात त्यांची भूमिका महत्त्वाची होती. थोडक्यात "बेटी बचाओ" मोहिमेच्या अग्रदूत म्हणून त्यांनी कार्य केले. .

### ८. *अनुताई वाघ*

आदिवासी समाजासाठी केलेल्या कार्यामुळे अनुताई वाघ या प्रसिद्ध आहेत. त्याचबरोबर "खेड्याकडे चला" हा महत्त्वपूर्ण नारा देऊन ग्रामीण व आदिवासी समाजासाठी शक्षणिक विकासासाठी महत्त्वाचे योगदान दिले. त्यांनी बोर्डी व कोसबाड सारख्या ग्रामीण व आदिवासी क्षेत्रात बाल शिक्षणाच्या प्रसाराचे मोठे कार्य केले आहे. या परिसरात त्यांनी दहा पाळणा घरे, अकरा बालवाड्या, चार पूर्व प्राथमिक शाळा, बालसेविका प्रशिक्षण वर्ग, कार्यानुभव प्रकल्प, रोजशाळा, तीन प्रौढ शिक्षण संस्था, स्त्री जागृती संस्था, मुकबधीर संस्था, आरोग्य केंद्र इत्यादी  महत्त्वाच्या संस्था सुरु केल्या. ताईंनी उपलब निसर्ग संपदा व साधासामग्री आणि माावी इच्छा शक्तीचा समवय साधून आदिवासी समाजाला शिक्षणात स्वावलंबी करण्याचे महत्वाचे कार्य केले.

### ९. *गोदावरी परुळेकर*

गोदावरी परुळेकर या श्रेष्ठ दर्जाच्या लेखिका होत. "जेव्हा माणूस जागा होतो" या ग्रंथात वारली आदिवासींचा लढा या विषयावर विस्तृत लेखा केले. विशेष म्हणजे ठाणे जिल्ह्यातील आदिवासी हे त्यांचे विस्तृत कार्यक्षेत्र होय. या भागात आदिवासींच्या विस्तृत जमिनी होत्या. परंतु बाहेरच्या लोकांनी शिरकाव केल्यामुळे या जमिनी या लोकांकडून बळकावल्या गेल्या. या जमिनी घेतांना त्यांनी आदिवासींचे भरपूर आर्थिक शोषण केले. उबरगाव, डहाणू, पालघर या भागात राहणाऱ्या आदिवासींच्या संरक्षणासाठी त्यांनी १९४५-१९४७ या काळात जो लढा दिला त्याचे नेतृत्व गोदावरी परुळेकर यांनी केले.

त्या आदिवासींचा वेठबिगारीपणा, जमिनदार विरुद्ध लढा कामाचा आदिवासींना योग्य मोबदला मिळावा म्हणून सरकारशी संघर्ष करत राहिले. त्यांनी जमीनदार, सावकार, सरकार यांच्या विरुद्ध विशेष लढा भारला व त्यातून आदिवासी संस्कृतीचे रक्षण केले व त्यांच्या अन्न, वस्त्र व निवाऱ्याची प्रमुख समस्या सोडविली.

- **धुळे जिल्हा परीक्षेत्रातील कार्य**

धुळे जिल्ह्याच्या आदिवासी क्षेत्राच्या विकासात गोदवारी परुळेकरांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. महाराष्ट्रात धुळे जिल्हा हा आदिवासी बहुल जिल्हा म्हणून ओळखला जातो. त्यातच आदिवासी स्त्रियांनी शहादा आंदोलाच्या माध्यमातून जमीदारांविरुद्ध जे आंदोलन उभे केले त्याचे श्रेय गोदावरी परुळेकरांच्या कुशल नेतृत्वाला जाते. त्यांच्याच सहकार्यातून १९५२ मध्ये सर्वोदय चळवळीतील युवक कार्यकर्त्यांनी शहाद्यामध्ये श्रमिक संघटोची स्थापना केली व जमीनदारांविरुद्ध



LBP PUBLICATION

आंदोलन सुरु केले. इतकेच नव्हे तर स्त्रियांचे विशेष करुन आदिवासी स्त्रियांच्या कौटुंबिक समस्या व व्यसामुक्ती आणि आंदोलनाला त्यांनी विशेष सहकार्य दिले.

- ***विशेष कार्य***

१. त्यांनी वारली जमातीचे नेतृत्व स्वीकारुन वारल्यांनी वेठबिगारी सोडावी याबाबत उंबरगाव, डहाणू, पालघर, जव्हार, तलासरी, काजळी, सवाई येथे दौरे काढले.
२. २१ जानेवारी १९४६ रोजी 'महालक्ष्मी' या गावी जाहीर सभा घेऊन खंडणी न देण्याच्या घोषणा करुन आदिवासी चळवळ संघटित केली.
३. आदिवासी महिलांमध्ये कायद्याची जागृती, त्यांच्यात अधिकाराची जाणीव करुा त्यांनी बार्डी, मयकवाड, कवाड, डहाणू या ठिकाणी जनजागृति मोहिम राबविली.
४. त्यांच्या विशेष कार्यात सरकार, सावकार, जमीनदार यांची आदिवासींवरील दडपशाही दूर करुन भुदाापद्धती, लगाच्या गाड्यांची पद्धती, अनियमित व आरोग्य मजुरी विरुद्ध जागरुकता, पिळवणूक बंदी, आदिवासी व शेतकऱ्यांना किमान वेतन कायदा, शेतमजूरीत वाढ इत्यादी मध्ये विशेष सवलती त्यांनी मिळवून दिल्या.

- ***नागराणी गिडालू (आदिवासी स्त्री योद्धा)***

क्रांतीकारी युद्धात सर्वात जास्त शिक्षा भोगणारी स्त्री म्हणून नागाराणी गिडालू हिचा उल्लेख करावा लागतो. तिला नागालँडची 'जोन ऑफ आर्क' म्हणतात. १७ वर्षाच्या राणी गिलाडू ने तब्ब्ल ४००० लोकांची फलटा तयार करुन गनिमी काव्याने बेजार केले. सा १९३२ मध्ये तीला कैद झाली व आजीवा कारावास झाला. सा १९९९ मध्ये भारत सरकारो महिला सशक्तीकरण वर्षात तिच्या नावाने 'राणी गिडालू' स्त्री शक्ती पुरस्कार जाहीर केला.

- **धुळे जिल्ह्यातील आदिवासी नेतृत्वाचा अभ्यास**

१. ***नजुबाई गावीत***

नजुबाई गावीत ह्या धुळे जिल्ह्यातील आदिवासी कर्तृत्ववान महिला आहेत. समाजवादी विचाराने भारावलेल्या व आदिवासी महिलांच्या विकासासाठी झटणाऱ्या नजुबाईंनी आदिवासी स्त्री विकासासाठी संबंधीत दोन पुस्तकांचे लेखा केले आहे. व आदिवासी चळवळीत सक्रीय सहभाग देऊन स्त्रियांना 'अंधश्रद्धे'च्या खाईतून बाहेर काढण्याचे महत्त्वपूर्ण काम त्यांनी केले आहे. तसेच त्या सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाच्या सक्रीय कार्यकर्त्या आहेत.

२. ***मंजुळाताई गावीत***

ह्या धुळे जिल्ह्यातील अत्यंत महत्त्वाचे नेतृत्व करणाऱ्या महिला आहेत. त्याचबरोबर भारतीय जाता पार्टीच्या सक्रीय सदस्या असून त्यानी धुळे महानगरपालिकेचे महापौर पद भुषविलेले आहे. त्या माध्यमातून धुळे शहराचा सामाजिक, आर्थिक व राजकीय, सांस्कृतिक विकास करण्याचा पूरेपूर प्रयत केला. त्याचबरोबर त्यांनी साक्री गटातून आमदारकीची निवडणुकही लढवली होती.

३. ***ज्योती पावरा***

धुळे जिल्ह्यातील तरुण आदिवासी स्त्री नेतृत्व आहे. त्या धुळे जिल्हा परिषद सदस्य असून त्या जिल्हा नियोजन समिती सदस्या आहेत. त्याचबरोबर राष्ट्रवादी काँग्रेसच्या सक्रीय कार्यकर्त्या असूा 'मुलगी वाचवा' अभियानाच्या सक्रीय कार्यकर्त्या असून समाजउपयोगी कामे करण्यात त्या नेहमी अग्रेसर असतात. विशेष करुन महिलांच्या समस्या यावर त्यांचे जिल्ह्यात विशेष कार्य आहे.

४. ***बेबीबाई भरत मालचे***

ह्या मु. पो. वालखेडा ता. शिंदखेडा जि. धुळे येथील आदिवासी महिला नेतृत्व असून त्या जिल्हा परिषद धुळ्याच्या सक्रीय सदस्या आहेत. आपल्या नेतृत्वाच्या माध्यमातून परिसरातील विकास व प्रबोधनाचे कार्य त्या करीत आहेत.

५. *आशाबाई रोहिदास ठाकरे*

ह्या नगाव गट (धुळे) येथून जिल्हा परिषद सदस्या म्हणून निवडून आल्या आहेत. आपल्या नेतृत्वाच्या माध्यमातून विकासाची धोरणे व लोकाभिमुख कामे करण्याची हातोटी त्यांच्याजवळ आहे.

वरील सर्व महिलांच्या कार्याचा आढावा घेतल्यास आपणास असे दिसून येते की, सर्व महिला ह्या आदिवासी क्षेत्रात कार्य करणाऱ्या समर्पित कुशल नेतृत्व असणाऱ्या आहेत. ह्या महिलांनी उभी केलेली महिला व जनजागृतीमुळे आदिवासी महिलांच्या राजकीय सामाजिकरणाला सुरुवात झाली आहे हे नाकारता येत नाही.

- **समारोप-**

वरील सर्व महिलांच्या कार्याच्या अभ्यासातुन स्पष्ट होते की, या महिलांनी आदिवासी महिलांच्या सामाजिक व राजकीय सामाजिकरण करण्यात समर्पित कार्य केले आहे. त्यांच्या या कार्यामुळे आदिवासी महिलांच्या अनेक समस्या जगासमोर आल्या व त्यामुळे शासन देखील या आदिवासी महिलांच्या समस्यांबाबत जागृत झाले आहे हे नाकारता येत नाही.

- **संदर्भ पुस्तके -**

१. वाडकर - कस्तुरे प्रभावती : महाराष्ट्र शासनाचे महिला विषयक धोरणे, एक चिकित्सक अभ्यास, प्रथम-आवृत्ती, अक्षरलेख प्रकाशन, नोव्हे.२०१०, सोलापूर

२. गाठाळ एस.एस. : भारतीय इतिहासातील स्त्रीया व स्त्री जीवन, कैलास पब्लिकेशन्स, औरंगपूरा, प्रथम-आवृत्ती, जुलै २०१३, औरंगाबाद.

३. कडू मोहिनी : भारतीय राजकारणातील स्त्रीया, विजय प्रकाशन, प्रथम-आवृत्ती, जुलै २००८, नागपूर.

४. अहिर प्रतिभा : समाजशास्त्रीय परिप्रेक्ष्यातुन स्त्रियांची आत्मकथने, कैलास पब्लिकेशन्स, प्रथम आवृत्ती, २०११, औरंगाबाद,

५. रानडे प्रतिभा : स्त्री प्रश्नांची चर्चा, एकोणीसावे शतक, पद्मगंध प्रकशन, २००५ , पुणे

६. बोर्ड, खडसे सुनिता, खडसे संतोष केशन : ऐतिहासिक परिप्रेक्षातील स्त्रीया इ.स.१८००, १९८४, शुभम पब्लिकेशन, प्रथम आवृत्ती, २०१०, जानेवारी.

७. कर्वे स्वाती : स्त्रियांचे मराठीतील निबंधलेखन, साहित्य अकादमी, प्रथम आवृत्ती, दिल्ली २०१३.

LBP PUBLICATION